# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 08.11.2012 (का.प.क्रं.17) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

गुरूवार दिनांक 08.11.2012 (का.प.क्रं.17) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, प्र.नगर सचिव तथा उपआयुक्त (प्रशासन) श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
04. स. श्री.आगा खान मिया खान
05. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
06. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
07. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
08. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
09. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
10. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
11. स. श्री. खान अक्रम करीम खान
12. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
13. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
14. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

**चर्चा :**

**श्री.नारायण कुचे** :वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे की, सर्वे नंबर 69 मुकूंदवाडी भागात 1 एकर 23 गुंठे जमिनीवर मनपाच्या अधिकारी यांनी अतिक्रमण केले आहे. या बाबत माहिती देण्यात यावी. सात बारा मुळ मालक श्री.साळवे यांचे नांवावर आहे.

**मा.सभापती** :प्रशासनाने खुलासा करावा.

**प्रशासकीय अधिकारी (श्री.डाके)** :अशी काही तक्रार आलेली आहे काय? याबाबत शोध घेण्यात येत आहे. प्रकरणाची माहिती घेऊन माहिती सादर करण्यात येईल.

**श्री.नारायण कुचे** :त्या ठिकाणी अतिक्रमण केलेले आहे का? अनेक वर्तमानपत्रामध्ये बातमी आलेली आहे.

**प्रशासकीय अधिकारी (श्री.डाके)** :शहानिशा करून प्रकरणाची माहिती देण्यात येईल.

**मा.सभापती** :येणाऱ्या सभेमध्ये सर्व माहिती देण्यात यावी.

**श्री.समीर राजुरकर** :मागील सभेत पॅथोलॉजी लॅबबाबत चर्चा झाली होती त्यावेळेस उपस्थित वैद्यकीय अधिकारी यांनी पॅथोलॉजी लॅबचे रजिष्ट्रेशन

करून देणे महापालिकेस अनिवार्य नाही. असा खुलासा केला आहे. सन 2007 ला मा.उच्च न्यायालयाने डीएमएलटी, सिएमएलटी, कुठलीही पॅथोलॉजी लॅब चालविण्यास बंदी केलेली आहे. महानगरपालिकेने बोगस डॉक्टरच्या कारवाईखाली सदरील लॅबवर कारवाई केलेली आहे का? ती करता येते का?

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :मा.न्यायालयाने निकाल दिलेला आहे की, डीएमएलटी, सिएमएलटी यांना स्वतंत्र प्रॅक्टीस करता येत नाही. एमएमआरडीकडे रजिस्ट्रेशन असलेले पॅथॉलॉजिस्ट त्यांचेकडे असावे किंवा पॅथॉलॉजिस्टने ते सर्टीफाय करावे. डिएमएलटी ही पदविका महाराष्ट्र कॉऊन्सिलकडे रजिष्टर्ड आहे.यामध्ये महाराष्ट्र कॉऊन्सिलकडुन आदेश प्राप्त झालेले आहेत. त्यांनी हे मॅटर केंद्र शासनाकडे रेफर केलेले आहे. याबाबतीत कुठलीही नियमावली तयार झालेली नसल्याने नियम तयार करण्याचे अदेशित कलेले आहे.

श्री.समीर राजुरकर :महाराष्ट्र वैद्यकीय परिषद डीएमएलटी, सिएमएलटीला रजिष्ट्रेशन देता येते. माझ्याकडे महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांचे पत्र आहे. डीएमएलटी, सिएमएलटी, एमएलटी या प्रयोगशाळा तंत्रज्ञ या शैक्षणिक अर्हता या परिषदेकडे नोंदणीकृत करता येत नाही. या परिषदेकडे एमबीबीएस, वैद्यकीय अर्हता प्राप्त व्यवसायिकाची नोंद करता येते. सेंटर मेडीकल कॉऊन्सिलकडे कुठल्या अर्थाने रजिष्टर्ड करता येत नाही. केंद्र सरकारकडुन याबाबतीत ॲक्ट तयार व्हायचा आहे. ठाणे, वसई याठिकाणी अशा प्रॅक्टीस करणाऱ्या लॅबवर तेथील लोकल सेल्फ गर्व्हमेन्टनी गुन्हा दाखल केलेला आहे. शहरात येणाऱ्या ग्रामीण भागातील नागरीक शहरी भागातील नागरीक यांची पिळवणुक आहे. शहरात फक्त 37 पॅथॉलॉजीस्ट आहे आणि 222 लॅब आहेत. लॅब टेक्निशियन रक्त,लघवी व इतरबाबी चेक करतात त्यामुळे डेंग्यु व इतर आजाराचे निदान योग्य पध्दतीने होत नाही. प्रशासनाने कायद्याचा आधार घेवुन लॅब विरोधात मोहिम आखण्यात येवुन कायदेशिर कार्यवाही केली पाहिजे.

मा.सभापती :डीएमएलटी, सिएमएलटी असणारे स्वतंत्र लॅबोरेटरी चालवु शकत नाही.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :बोगस डॉक्टरांविरूध्दची समिती ही पोलिस आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली असते. बैठक घेण्याबाबत महानगरपालिकेने विनंती केलेली आहे.

श्री.समीर राजुरकर :शासनाचा जीआर आहे. महानगरपालिकेचे मा.आयुक्त अध्यक्ष आहेत आणि आरोग्य वैद्यकीय अधिकारी सचिव आहेत.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :कार्यवाही करणार आहेत. रिपोर्ट चुकीचे आलेले आहेत.

मा.सभापती :डीएमएलटी, सिएमएलटी हे टेक्निशियन म्हणुन काम करू शकतात. जर स्वतंत्ररित्या लेबॉरेटरी चालवत असेलतर त्यांना परिषदेकडे नोंदणीकृत असलेल्या प्राप्त पॅथॉलॉजी नियुक्त करावी व त्यांचेकडुन अहवाल प्रमाणित करून घ्यावे.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :एमएमसी रजिष्टर्ड डॉक्टरकडुन प्रमाणित करून घ्यावे लागते.

मा.सभापती :मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी स्वतंत्र व्यवसाय करणारे डीएमएलटी, सिएमएलटी वर त्वरीत कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. लॅबचे वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळे रिपोर्ट येतात हे नागरीकांच्या आयुष्याशी खेळणे आहे. महानगरपालिकेने यावर नियंत्रण ठेवले पाहिजे. पॅथॉलॉजिष्टचे रजिष्ट्रेशन किती आहेत.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :44 रजिष्टर्ड पॅथॉलॉजिष्ट आहे.

मा.सभापती :सर्व पॅथॉलॉजिवर कारवाई संबधी मोहिम आखण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :सर्वे सुरू केलेला आहे. बोगस आढळल्यास एफआरआय दाखल करणार आहे.

मा.सभापती :मोहिम सुरू करण्यात येवुन माहिती स्थायी समितीला देण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :बायोवेस्ट प्रकल्प मा.सर्वसाधारण सभेने घेतलेल्या ठरावानुसार सन 2001 पासून कार्यरत आहेत. तत्कालिन आयुक्त व त्या त्या तत्कालिन आरोग्य वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी यांनी त्यावेळेस शहरात नर्सिंग होम नव्हते. डायरेक्ट चेक देत होते. मनपाकडे चेक जमा होत होते. ते डायरेक्ट कंपणीकडे जमा करतो. माझ्या माहितीप्रमाणे मनपाकडे जी रॉयल्टी यायला पाहिजे. ती किती जमा झालेली आहे. याबाबत मनपाकडे कुठलिही बॅलेन्सशिट नाही. चेक इथे जमा न होता डायरेक्ट त्याठिकाणी जमा होत आहे. आरोग्य विभागाचे बॅलेन्सशिट मागवुन किती रॉयल्टी जमा केली जाते व त्यांचेकडे किती बाकी आहे. यासंबधी गेवराई तांडा येथे यंत्रणा लावण्यात आलेली आहे. तेथील आजुबाजूचे नागरीक त्या वासांनी त्रस्त झालेले आहेत. या सर्व विषयाचा गांभियाने विचार केला पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :ॲग्रीमेंट प्रमाणे त्या ठिकाणी काहीही काम झालेले नाही. शहरातील हॉस्पीटलचे रजिष्ट्रेशन झालेले आहे. त्या ठिकाणाहुन बायोवेस्ट घेऊन त्याची योग्यरित्या विल्हेवाट लावायची आहे. परंतु याबाबत कुठलीही ॲक्टीव्हीटी होत नाही. बायोवेस्ट कचरा काही प्रमाणात त्या ठिकाणी नेला जातो व त्याच ठिकाणी सडवला जातो. ही अतिशय गंभिर बाब आहे. ॲग्रीमेट प्रमाणे काम झालेले नाही. याचा गंभिर त्रास नागरीकांना सहन करावा लागत आहे. रॉयल्टी हा महत्वाचा भाग असुन त्यापेक्षाही नागरीकांच्या आरोग्य महत्वाचे आहे. शहरातील हॉस्पीटलचे बायोवेस्ट डायरेक्ट कचरा कुंडयांमध्ये टाकले जाते. अतिशय गंभिर बाब असुन याकडे त्वरीत लक्ष देणे गरजेचे आहे. भविष्यात गंभिर परिणामाला शहराला सामोरे जावे लागेल. संपुर्ण यंत्रणा ढासळलेली आहे. त्यामुळे नविन यंत्रणा उभारण्याची गरज आहे. जुण्या यंत्रणा काहीही कार्यवाही करत नाही. त्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :सन 2005 ते 2012 पर्यंत 56,69119 रूपये केलेले आहेत. 928 डॉक्टरांचे त्यांचेकडे रजिष्ट्रेशन झालेले आहे. या विभागाचे ऑडीट करण्याची जबाबदारी आरोग्य विभागाची असली पाहिजे. तीन ते चार वर्षापासून या विभागाचे ऑडीट का करण्यात आले नाही.

मा.सभापती :नाशिकच्या धर्तीवर हा प्रोजेक्ट घेण्यात आला होता. रूग्णालयातील कचरा त्या ठिकाणी जमा करण्यात येतो. स.सदस्यांनी उपस्थित केलेला जो मुद्दा आहे तो अतिशय गंभिर स्वरूपाचा आहे. संबधीत विभागाने रॉयल्टीबाबी विषयी ऑडीट करण्यात यावे. रॉयल्टी किती जमा होत होती व मनपाकडे किती रक्कम जमा केली. याबाबत ऑडीट करण्यात यावी. प्रोजेक्टची आजची तेथील परिस्थिती काय आहे याबाबत माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :सर्व मेडीकल ऑफिसर यांना बायो मेडीकल वेस्टच्या ऑडीटसाठी नेमण्यात आले आहे. सर्वे सुरू करण्यात आलेला आहे. दोन दिवसात माहिती समोर येईल. एजी नागपूर यांचेकडून दरवर्षी ऑडीट केले जाते.

मा.सभापती :शहरात किती रजिष्टर्ड डिस्पेन्सरी आहे. याबाबत माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्यकीय अधिकारी :सर्वे सुरू करण्यात आलेला आहे. माहिती लवकरच सभागृहाला देण्यात येईल.

मा.सभापती :प्रोजेक्ट योग्यरित्या चालत नाही. आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी स्वतः प्रकल्पाची पहाणी करुन माहिती देण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :जीटीएल कंपणीला एलबीटी भरणा करणेबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री.बाळासाहेब मुंडे :महानगरपालिकेचे लाईटबील जीटीएल कंपणीला भरणा करणे बंद केले जावे त्यातुन मनपाची एलबीटी वसुल केली जावी.

श्री.गिरजाराम हळनोर :स्थायी समितीने अनेक निर्णय घेतलेले आहे. परंतु त्याची अंमलबजावणी प्रशासनाकडुन होत नाही. बीओटी प्रकल्पाबाबत निर्णय घेण्यात आला होता की, आहे त्या स्थितीत काम थांबविण्यात यावे. परंतु सर्व कामे चालु आहेत. शहानुरवाडी येथील मॉल समोरील नाल्याची लांबी, रूंदी आणि डेप्थ किती याबाबतची माहिती दिलेली नाही. नाल्यावरील भिंतीचे बांधकाम करण्यात आले नाल्यातील कचरा साफ करण्यात आलेला नाही. मॉलमधील पार्कींगची व्यवस्था करण्यात आलेली नाही. याबाबत प्रश्न विचारण्यात आले होते त्याचेही उत्तर प्राप्त झालेले नाही.

मा.सभापती :स.सदस्य यांनी जे मुद्दे उपस्थित केले आहे. त्याबाबत प्रशासनाने खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता(बीओटी) :शहानुरवाडी सर्वे नंबर 12 , आरक्षण क्रमांक 262 नेनो मेघा मॉलचे शॉपिंग कॉम्पलेक्सचे काम पुर्ण झालेले असुन पार्कींग बेसमेंन्टमध्ये देण्यात आलेली आहे. शॉपिंग कॉम्पलेक्सची पार्कींग बेसमेंन्टमध्ये देण्यात आलेली आहे. नाल्यावर एक्सजेस्टींग

रिटनिंग वॉल बांधण्यात आलली आहे. आवश्यकता वाटल्यास नाल्यामधील साफसफाई पुन्हा एकदा करण्यात येईल.

श्री.समीर राजुरकर :जुनी रिटनिंग वॉल तोडुन साडेपाच फुट आतमध्ये नविन रिटनिंग वॉल बांधण्यात आलेली आहे. एक्सजेस्टींग रिटनिंग वॉल हा शब्द मागे घेण्यात यावा.

श्री.गिरजाराम हळनोर :प्रत्यक्ष स्थळ पहाणी करण्यात यावी. बेसमेंन्टमध्ये पार्कींग होऊ शकते का? जुन्या शहरामध्ये पार्कींगचा जो प्रश्न निर्माण झालेला आहे. तोच प्रश्न त्या ठिकाणी निर्माण होणार आहे. त्याबाबत पहाणी करण्यात यावी.

श्री.समीर राजुरकर :समोर दुकान काढायची आणि पाठीमागे पार्कींग द्यायची हे चुकीचे आहे.

मा.सभापती :पार्कींगचे काम नियमानुसार करणे आवश्यक आहे. आऊटलेट काढणे आवश्यक आहे. बेसमेंन्टमध्ये पार्कींग घेणाऱ्यांना रेन हार्वेस्टींग कंम्पल्सरी करण्यात यावे.

कार्यकारी अभियंता(बीओटी) : पार्कींगसाठी नियमाप्रमाणे मोठा रॅम देण्यात आलेला आहे.

मा.सभापती :मोठमोठे मॉल उभारण्यासाठी रेन हार्वेस्टींग कंम्पल्सरी करण्यात यावे. बेसमेंन्टमधील पार्कींगची प्र.आयुक्त तथा शहर अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी करावी. येणाऱ्या सभेमध्ये माहिती देण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य :शहानुरवाडी येथील बाजारातील पार्कींग कामगार चौकापर्यंत पार्कींग करत आहे. महानगरपालिकेने ज्यांना अधिकृत केले नाही. असे काही मुले महिलांना मुलींना तसेच नागरीकांची अडवणुक करून पार्कींगच्या नावाखाली पैसे उकळत आहे. यावर महानगरपालिकेचे काय नियंत्रण आहे. खुलासा करण्यात यावा.

मालमत्ता अधिकारी :शहानुरवाडी येथील बाजारातील पार्कींग रस्त्यावर न भरता पार्कींगच्या जागेवर भरविण्यात यावी म्हणुन कार्यकारी अभियंता बीओटी यांना कळविण्यात आलेले आहे. रस्त्यावर पार्कींग होणार नाही याबाबत यापुढे दक्षता घेण्यात येईल.

मा.सभापती :नागरीकांना पार्कींगची सवय लागण्यासाठी काही दिवसांसाठी मनपाचे कर्मचारी त्या ठिकाणी नेमण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :पार्कींगसाठी कायदेशिररित्या मनपाने ठेका दिलेला आहे का? हजारो रूपये त्या ठिकाणाहुन अनाधिकृतरित्या वसुल/जमा केले जातात त्यावर मनपाचे कुठलेही नियंत्रण नाही.

उपआयुक्त(सिडको) :मनपाने त्या ठिकाणावरील अनाधिकृतरित्या चालविल्या जाणाऱ्या पार्कींगवरील लोकांवर कारवाई केली होती. परंतु मध्यंतरी अतिक्रमणाच्या मोहिमेमुळे कारवाई करता आली नाही.

श्री.समीर राजुरकर :मालमत्ता विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या संलग्नेतुन हे काम चालु आहे. अधिकाऱ्यांनी यावर लक्ष देवुन त्यांचेवर नियंत्रण ठेवण्यात यावे. संबधीतांवर गंभिर गुन्हे दाखल करण्यात यावे.

मालमत्ता अधिकारी :शहानुरवाडी येथील बाजाराची वसुली करण्याचे काम संबधीत गुत्तेदार यांचेकडे आहे ते बीओटी कक्ष प्रमुख यांच्या अखत्यारीत येते.

| | |
|---|---|
| कार्यकारी अभियंता(बीओटी) | :युरोपिअन मार्केटचे सर्व पझेशन बीओटी ऑपरेटर यांना देण्यात आलेले आहे. आतील पार्कींगचे वसुलीचे काम त्यांचेकडे देण्यात आलेले आहे. |
| श्री.समीर राजुरकर | :भाजी मार्केटमध्ये येणाऱ्या नागरीकांकडुन वसुली करण्याचे काम कुणाकडे आहे? |
| कार्यकारी अभियंता(बीओटी) | :बीओटी ऑपरेटर यांचे आहे. |
| श्री.समीर राजुरकर | :रस्त्यांवरील पार्कींग बंद करण्यात यावी तसेच आतील भाजी मार्केटमध्ये येणाऱ्या नागरीकांकडुन पार्कींगची वसुली आजपासून बंद करण्यात यावी. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :बीओटी ऑपरेटर यांनी कामे केलेली नाहीत. |
| कार्यकारी अभियंता(बीओटी) | :बीओटी ऑपरेटरला काम दिलेले असुन त्यास पझेशन दिलेले आहे. ट्रेसेस्टच्या अगेस्टमध्ये त्याच्या कंम्पोनंन्टमध्ये बाजार सुरू करण्यात आलेला आहे. हे सर्व काम त्यांच्या पझेशनमध्ये चालु आहे. |
| मा.सभापती | :टाईम पिरेड सहा महिण्यांचा आहे. ट्रेसेस्टच्या अगेस्टमध्ये ओटे दिलेले आहे. |
| कार्यकारी अभियंता(बीओटी) | :रस्त्यावर पार्कींग केलेल्या वाहनांकडुन पार्कींग फिसची जी वसुली चालू आहे त्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल. |
| मा.सभापती | :मनपाचे गार्ड येणाऱ्या सोमवारी त्या ठिकाणी नेमण्यात यावे. नागरीकांना पार्कींगची सवय लागेल. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :शहानुरवाडी येथील चौपाटीवर प्रशासनाने अद्यापपर्यंत कुठलीही कार्यवाही केलेली नाही. |
| श्री.विजेंद्र जाधव | :पडेगांव येथील किती अतिक्रमण काढले माहिती देण्यात यावी. |
| मा.सभापती | :खुलासा करण्यात यावा. |
| उपआयुक्त (सिडको) | :अनाधिकृत प्लॉटिंगबाबत अनेक तक्रारी आलेल्या होत्या. त्यानुषंगाने सरकारी जमीनीवरील 35 एकरवरील प्लॉटिंग तोडण्यात आलेली आहे. |
| श्री.विजेंद्र जाधव | :किती गुन्हे दाखल केलेले आहे. |
| उपआयुक्त (सिडको) | :सर्व माहिती एकत्र केलेली आहे गुन्हे लवकरच दाखल होतील. |
| श्री.विजेंद्र जाधव | :35 एकर जागेवरील अतिक्रमण काढलेले आहे. अतिक्रमण विभाग व बी.आय यांनी चांगले काम केलेले असतांना बी.आय च्या बदल्या का? करण्यात आल्या. |
| उपआयुक्त(सिडको) | :प्रशासनाला अपेक्षीत यश येत नव्हते त्यामुळे अशा सर्व बी.आयच्या बदल्या केलेल्या आहेत. अंतर्गत बदल करण्यात आलेले आहेत. |
| मा.सभापती | :चांगले काम केले म्हणुन चांगल्या ठिकाणी पाठविण्यात आले आहे का? |
| उपआयुक्त(सिडको) | :अभिनंदन म्हणुननच चांगल्या ठिकाणी पाठविण्यात आलेले आहे. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :चौपाटी बाबत खुलासा घेण्यात यावा. |
| उपआयुक्त (सिडको) | :संचिका पुटअप केलेली आहे. |

मा.सभापती :35 एकर जमीनीवरील अतिक्रमण काढलेले आहे. गुन्हे केव्हा दाखल करणार.

उपआयुक्त (सिडको) :गुन्हे दाखल करण्यासाठी सर्व माहिती एकत्रीत केलेली आहे. पोलीस स्टेशनला कागदपत्र दिलेली आहे. गुन्हे दाखल करून घ्यायचा की नाही हा प्रश्न पोलीसांचा आहे.

श्रीमती सविता घडमोडे :माझ्या वार्डात पाण्याचा प्रश्न अतिशय गंभिर आहे. वारंवार सभेमध्ये हा प्रश्न मांडण्यात आला. 200 ते 300 नागरीकांना त्रास आहे.

श्री.समीर राजुरकर :गेल्या 4 महिण्यांपासून स.सदस्या हा प्रश्न मांडत आहे. अडचण काय आहे या बाबत माहिती देण्यात यावी.

शाख अभियंता (श्री.नाना पाटील) :वार्ड क्रमांक 77 वार्डातील दोन संचिका लेखा विभागात मंजुरीस्तव पाठविण्यात आल्या होत्या परंतु तरतुद उपलब्ध नाही म्हणुन रिमार्क आलेला आहे. तसेच पाणीपुरवठा करण्यासाठी त्या ठिकाणी सपोर्टींग लाईन टाकावी लागणार आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :पाण्याच्या अत्यावश्यक कामासाठीही समांतर जलवाहीनीचे कारण सांगीतले जाते.

श्री.वरदाजी गुजर :चार महिण्यांपासून माझ्या वार्डातील लिकेज काढण्यात आलेले नाही.

श्री.बाळासाहेब मुंडे :जयभवानीनगर येथे लिकेजेस जास्त प्रमाणात आहे. 5 ते 7 लाखाचे इस्टीमेट आहे. खर्चासाठी लाखो लिटर पाणी वाया घालत आहे.

श्री.समीर राजुरकर :सदरील समस्या तात्काळ सोडविण्यात यावी जेणेकरून पुढील स्थायी समितीमध्ये हा विषय येता कामा नये. गेल्या दोन बैठकीपुर्वी टिव्ही सेंटर येथील अतिक्रमण काढण्याविषयी सांगण्यात आले होते. या विषयामध्ये साधारणत: 22 दिवस झ ाालेले आहे काय कार्यवाही केली आहे.

उपआयुक्त (सिडको) :संचिका मंजूर झालेली आहे. प्लॉटिंगवरील अतिक्रमण काढण्याच्या मोहिमेमुळे तेथील कार्यवाही स्थगीत झाली होती.

श्री.समीर राजुरकर :महानगरपालिकेने ठरविल्यावर सदर कारवाई एक दिवसाची नाही.

उपआयुक्त (सिडको) :तात्काळ कारवाई करण्यात येईल.

म.सभापती :रेल्वेस्टेशन येथील अनाधिकृत बांधकामाबाबत कारवाई केव्हा करणार आहे. सदरील बांधकामाला परवानगी नाही.

उपआयुक्त (सिडको) :नगर रचना विभाग आणि शहर अभियंता अहवाल देणार आहे त्यानंतर पुढील काम करण्यात येईल.

मा.सभापती :अनाधिकृतरित्या बांधकाम केले जाते. लोकप्रतिनिधींवर अरोप केले जातात.

उपआयुक्त (सिडको) :अहवाल आल्यास कारवाई करण्यात येईल.

श्री.नारायण कुचे :मुकूंदवाडी येथील काही दिवसांपूर्वी अतिक्रमण काढण्यात आले परंतु भाजीवाले पुन्हा रोडवर बसत आहे त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

| | |
|---|---|
| उपआयुक्त (सिडको) | :अर्ध्या एकर जागा लेव्हल करून दिल्यास भाजीवाल्यांचा त्रास कमी होईल. |
| मा.आयुक्त | :मा.आयुक्तांना सांगुन सदरील समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. संचिका पुटअप करून मान्यता घेण्यात यावी. |
| श्री.बाळुलाल गुजर | :त्या ठिकाणाहुन ॲम्ब्युलन्सही जात नाही. |
| श्रीमती प्राजक्ता राजपूत | :शिलाई मशिनचे वाटप केव्हा होणार आहे. खुलासा करण्यात यावा. |
| श्री.नारायण कुचे | :तीन वर्षापासून मशिनचे वाटप करण्यात आलेले नाही. 15 मशिन एका वार्डाप्रमाणे देण्यात याव्या. |
| प्र.आयुक्त तथा श.अ. | :शिलाई मशिनच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होते. या संदर्भात मा.आयुक्तांनी चौकशी समिती गठीत केली होती. समीतीचा अहवाल मा.आयुक्तांकडे सादर करणार आहे. त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| श्री.समीर राजुरकर | :शासन निर्णयानुसार 5 टक्के अनुकंपा भरती करणे अनिवार्य आहे. गेल्या 5 वर्षापासून अनुकंपावर किती जणांची भरती केली. शासन निर्णयानुसार 30 दिवसांत नियुक्ती करणे आवश्यक आहे. किती कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्यात. तसेच 12 वर्ष सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांचे प्रकरणावर आस्थापना विभागाने कोणती कार्यवाही केलेली आहे. अनुकंपावरील यादीत दत्तकपुत्र, पुत्री यामध्ये 100 टक्के गुन्हे दाखल होतील. वेळोवेळी झालेली चुक आस्थापना विभागाने पुन्हा पुन्हा करू नये. दत्तक विधान मा.न्यायालयाच्या प्रमाणपत्रानुसार झालेले आहे का? 100 रूपयाच्या बॉन्डपेपरवर दत्तक पुत्राचे प्रकरण किती दिवसांपासून चालु आहे. |
| श्री.नारायण कुचे | :श्री.तांबे नावाच्या कर्मचाऱ्याचे निधन अडीच वर्षापुर्वी झालेले आहे. परंतु त्यांच्या वारसांना कुठलाही लाभ अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही. प्रशानसन आपल्याच कर्मचाऱ्यांना वेळेवर न्याय देवु शकत नाही. ही गंभिरबाब आहे. |
| मा.सभापती | :याबाबतीत लाड समितीच्याबाबतीत, कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाबाबत गंभिर आरोप प्राप्त झालेले आहेत. सेवापुस्तक, सुट्टीचा मोबदला, 12 वर्षाची सेवेचा लाभा अशा अनेक प्रश्न सोडविण्यात येत नाही. |
| आस्थापना अधिकारी-2 | :लाड समितीचे प्रकरणे वेळोवेळी निकाली काढली जातात. नोव्हेंबर मध्ये 22 प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहे. तसेच 12 वर्षाचे 9 प्रकरणे आणि लाड समितीचे 16 प्रकरणे मा.आयुक्तांच्या स्वाक्षरीसाठी ठेवण्यात आलेली आहेत. |
| श्री.समीर राजुरकर | :किती प्रकरणे किती दिवसांपासून प्रलंबित आहेत. |
| आस्थापना अधिकारी-2 | :सात ते आठ महिण्यांपासून 59 प्रकरणे प्रलंबित आहेत. |
| श्री.समीर राजुरकर | :शासन निर्णयाप्रमाणे किती दिवसात लाड समितीचे प्रकरणे निकाली काढली पाहिजेत. तसेच आस्थापना समितीच्या बैठकीचा नियम काय आहेत व किती दिवसांत बैठक घ्यायला पाहिजे. |
| आस्थापना अधिकारी-2 | :आस्थापना समितीची बैठक दर महिण्याला घ्यायला पाहिजे. |

श्री.समीर राजुरकर :नऊ महिण्यात आस्थापना समितीच्या किती बैठका झाल्यात.

आस्थापना अधिकारी-2 :अध्यक्षाच्या मंजूरीनंतर बैठक लावता येते. दोन महिण्यातुन एकदा बैठक झालेली आहे. 59 प्रकरणांमध्ये काहिजणांची कागदपत्रांची पुर्तता झालेली नाही. 80 टक्के कर्मचाऱ्यांची पुर्तता झालेली नाही. 20 टक्के कर्मचाऱ्यांची पुर्तता झालेली आहे.

श्री.समीर राजुरकर :यादीमध्ये 35,24 नंबरवरील नावामध्ये दत्तकपुत्राचा उल्लेख केलेला आहे. कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. प्रतिक्षा यादीमध्ये दादाराव तांबे यांचे नावांवर दत्तकपुत्र विजय दामोदर लाटे असे केलेले आहे. कागदपत्र पुर्तता नसेलतर प्रतिक्षा यादीमध्ये नांव घेण्यात येऊ नये. मा.न्यायालयातुन दत्तक पुत्र विधान करून आणल्यानंतर प्रतिक्षा यादीमध्ये नांव घ्यायला हवे. आस्थापनेचा खर्च एकुण महानगरपालिकेच्या खर्चाचा किती टक्के पाहिजे.

आस्थापना अधिकारी-2 :42 टक्के.

श्री.समीर राजुरकर :मा.आयुक्तांकडे संचिका गेल्यावर स्वाक्षरी का होत नाही. लाड समिती, 12 वर्षाची वेतनश्रेणी असे 200 प्रकरणे प्रलंबित आहे. आस्थापनेची बैठक दर महिण्याला होणे गरजेचे आहे. लाड समितीच्या शासन निर्णयानुसार 30 दिवसात प्रकरण निकाली काढणे आवश्यक आहे.

आस्थापना अधिकारी-2 :स.सदस्य जे बोलत आहे ते बरोबर आहे.

मा.सभापती :अध्यक्ष कोण आहेत.

आस्थापना अधिकारी-2 :अध्यक्ष उपआयुक्त महसूल आहेत.सध्या उपआयुक्त नसल्याकारणाने नविन समिती गठीत करून मा.आयुक्तांकडे स्वाक्षरीकरीता पाठविण्यात आलेली आहे.

श्री.समीर राजुरकर :प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढण्यात यावी. प्रकरणे निकाली न निघाल्यामुळे सभ्रम निर्माण होतो. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांना चकरा मारायला लावु नका.

मा.सभापती :बॉन्डपेपर बाबत खुलासा करण्यात यावा.

आस्थापना अधिकारी-2 :शासन निर्णयात उल्लेख केलेला आहे की, कार्यरत कर्मचारी यांना अपत्य नसेल तर अन्य कोणत्याही व्यक्तीला दत्तक घेऊ शकतो.

श्री.समीर राजुरकर :मा.न्यायालयातुन दत्तक विधान केल्यानंतर न्यायालयाची जी ऑर्डर आहे त्यास दत्तकचा अधिकार आहे.

मा.सभापती :किती विषय असे केलेले आहेत. मा.न्यायालयाच्या आदेशानंतर अशी किती प्रकरणे केलेले आहेत.

आस्थापना अधिकारी-2 :आकडा सांगता येणार नाही. प्रकरणे झालेली आहेत.

मा.सभापती :मा.न्यायालयाच्या आर्डर नुसार की, बॉन्डपेपरवर झालेली आहेत.

श्री.समीर राजुरकर :बॉन्डपेपरवरील नियुक्त्या थांबविण्यात याव्या.

मा.सभापती :शासन निर्णयामध्ये काय आहे.

आस्थापना अधिकारी-2 :अपत्य नसेलतर कुणालाही नौकरी देवु शकतात.

श्री.समीर राजुरकर :(लेखी हमी कोर्टातुन घेण्याबाबत वारसाहक्क प्रमाणपत्राबाबतीतील लाड समितीतील शासन निर्णय स.सदस्य वाचुन दाखवतात.)

| | |
|---|---|
| मा.सभापती | :स.सदस्यांनी वाचुन दाखविलेले बरोबर आहे. त्याप्रमाणे आपण केले. |
| आस्थापना अधिकारी-2 | :बरोबर आहे. आस्थापना समिती निर्णय घेते. |
| मा.सभापती | :मा.न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे केले आहे. |
| आस्थापना अधिकारी-2 | :बघुन सांगण्यात येईल. |
| मा.सभापती | :स.सदस्यांचे एखादे प्रकरण गेले असता प्रशासनातर्फे शासन निर्णय दाखविण्यात येतो. ज्यांना खरी गरज आहे. ज्यांना न्याय मिळाला पाहिजे त्यासाठी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे.दर महिण्याला आस्थापना समितीची बैठक झाली पाहिजे. त्यासंबधीचा अहवाल स्थायी समितीला दिला पाहिजे. लाड समितीच्या प्रकरणाबाबत माहिती देण्यात यावी. |
| श्री.समीर राजुरकर | :दर महिण्याला बैठक बोलावुन प्रकरण निकाली काढली पाहिजे. |
| मा.सभापती | :ॲक्शनपॉंईट बाबत खुलासा करण्यात यावा क्रमांक 1 सर्व विभाग प्रमुखांनी स्थायी समितीला हजर राहणे |
| प्र.आयुक्त तथा श.अ. | :परिपत्रक काढण्यात आलेले आहे. |
| मा.सभापती | :स्थायी समितीमध्ये रजिष्टर ठेवुन हजेरी नोंदविण्यात यावी.<br>मुद्दा क्रमांक 3 गुंठेवारी विभागाची दोन प्रकारची विभागनी करणे |
| प्र.आयुक्त तथा श.अ. | :कारवाई सुरू केलेली आहे. |
| मा.सभापती | मुद्दा क्रमांक 4 धन्वंतरी भागातील लाईट सुरू करणे. पायाभुत सुविधेची काय स्थिती आहे आणि काय निर्णय घेणार. |
| कार्यकारी अभियंता(बीओटी) | :इन्फ्रास्ट्रक्चर एकदम सडलेले आहे. 25 वर्षापासून अंन्डरग्राऊंड केबल आहे. 7 वर्षापुर्वी बीओटी करण्यात आलेली आहे. पुर्वी 10 हजार पोल होते आज 33 हजार पोल झालेले आहेत. इन्फ्रास्ट्रक्चरचे इनोव्हेशन करणे गरजेचे आहे. तीन भागामध्ये काम करण्याचे नियोजन आहे. |
| मा.सभापती | :टाईम लिमिट दिली पाहिजे. |
| कार्यकारी अभियंता(बीओटी) | :पुर्वी स्थायी समितीने आदेशित केल्याप्रमाणे एक्सप्लेशन ऑफ इन्टरेस्टची तयारी केलेली आहे. सर्व्हे करावे लागणार आहे. सर्वेसाठी वेळ लागणार आहे. |
| श्री.समीर राजुरकर | :10 हजार पोल कुठले. |
| कार्यकारी अभियंता(बीओटी) | :मुख्य रस्ते जास्तीचा वापर होणारे रस्ते घेतलेली आहे. |
| मा.सभापती | :शहरातील महत्वाचे रोड घेण्यात यावे. |
| श्री.रेणुकादास वैद्य | :सुचना अशी आहे की, मुख्य रस्त्यावर दिव्यांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. परंतु गल्ल्यामधील दिव्यांकडे लक्ष देण्याची जास्तीची गरज आहे. चोरीच्या घटना जास्त घडत आहे. |
| मा.सभापती | : |

<u>विषय क्र. 81 :</u> (विषय क्र. 64 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 16/10/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

**दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

मा.सभापती: विषय स्थगीत करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 82 :**

**दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7), 03/08/2012 (का.प.क्र.8), 10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.**

मा.सभापती: विषय स्थगीत करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 83 :**

**प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला चिकलठाणा येथील कै.देविदास भाऊ नवपुते सभागृह भाडे तत्वावर मिळणे बाबत तेजस्वी शिक्षण संस्कार बहुउद्देशिय सेवाभावी संस्था तरोडा (खु) नांदेड या संस्थेने मागणी केली आहे. सदर सभागृहाचे तळघर व तळमजला असे एकत्रित 519.21 चौ.मी. एवढे बांधकाम आहे. सध्या सदर सभागृह वापरात नाही. सदर संस्थेने विद्यार्थी केंद्रीभुत घटक माणुन शैक्षणिक उपक्रम राबवण्यासाठी व संस्थेने केलेली शैक्षणिक उपक्रमांना गती मिळावी म्हणुन सदर सभागृह भाडे तत्वावर मिळावे म्हणुन मागणी केली आहे. सदर सभागृहाकरीता वार्षिक भाडे रक्कम रू.6,03,894/- एवढे होते. तथापी, संस्थेचे कार्य, उद्देश व विनंती विचारात घेता भाडे दरात 50% सवलत देण्यासह नेहमीच्या अटी शर्तीस अधिन राहून 3 वर्षाचे कालावधी करीता संस्थेस सदर सभागृह भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.**

मा.सभापती: विषय स्थगीत करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 84 :**

**शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, टाऊनहॉल ते विद्यापीठ गेट ते लिटील फ्लॉवर स्कुल या विकास योजनेतील रस्त्याच्या दोन्ही बाजूने आवश्यक ठिकाणी 300 मी.मी. व्यासाची SWG मलनि:सारण वाहिन्या टाकण्याच्या कामांचे सुधारीत अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (MJP) आणि महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ (MIDC) या विभागाच्या सन 2011-12 च्या DSR प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून र.रू.91,56,029/- चे आहे.**

**मा.सर्वसाधारण सभा विषय /ठराव क्र.720 दिनांक 20/04/2012 अन्वये या कामाच्या अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेली आहे. ई-टेंडर विभागामार्फत या कामासाठी तीन (03) वेळा निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. शेवटच्या वेळी दोन कंत्राटदारांनी मे.एल.के. कंस्ट्रक्शन व मे.राणा कंस्ट्रक्शन यांनी दर भरून निविदा सादर केल्या परंतु मे.राणा कंस्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे निविदेसोबत जोडण्यात आलेले EMD Certificate कमी रक्कमेचे असल्यामुळे त्यांची निविदा उघडण्यात आलेली नाही. मे.एल.के.कंस्ट्रक्शन यांची निविदा उघडण्यात आली असून त्यांनी ऑफर केलेले निविदा दर 32.1% जास्त आहे. या जास्तीच्या दराबाबत कंत्राटदार यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला तसेच पत्र जा.क्र./मनपा/शअ/474/2012, दिनांक 01/08/2012 अन्वये अंदाजपत्रक दराने काम करणेस विचारणा करण्यात आली. दिनांक 06/08/2012 च्या पत्रान्वये कंत्राटदार मे.एल.के. कंस्ट्रक्शन यांनी त्यांचा खुलासा कार्यालयास कळविला असून 32.1% जास्त दराने काम करण्यास तयार असल्याचे कळविले आहे. त्यानंतर विभागाने 30% जास्त दर मान्य करण्याची शिफारस केल्यानुसार लेखा विभागाची आणि मा.आयुक्त महोदय यांची 30% जास्त दरास मंजुरी प्राप्त झाली आहे.**

**वरील प्रमाणे मे.एल.के. कंस्ट्रक्शन यांचे 32.1% जास्त दरा ऐवजी 30% जास्त दर मान्यतेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.**

**मा.सभापती : SWG ऐवजी RCC मलनि:सारणवाहिनी टाकण्यात यावी. दुरूस्तीसह मंजूर.**

**<u>ठराव :</u>**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टाऊनहॉल ते विद्यापीठ गेट ते लिटील फ्लॉवर स्कुल या विकास योजनेतील रस्त्याच्या दोन्ही बाजूने आवश्यक ठिकाणी 300 मी.मी. व्यासाची SWG मलनि:सारण वाहिन्या टाकण्याच्या कामांसाठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार निविदाधारक मे.एल.के. कंस्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदर काम मे.एल.के. कंस्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दरापेक्षा 32.1% जास्त दरा ऐवजी 30% जास्त दराने करून घेण्यास व SWG ऐवजी 300 मी.मी. व्यासाची RCC मलनि:सारण वाहिन्या टाकण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>विषय क्र. 85 :</u>**

**प्रस्ताव सादर करण्यात येतो की, केंद्र शासनातर्फे जाहीर झालेल्या राजीव आवास योजने अंतर्गत देशातील सर्व शहरे झोपडपट्टी मुक्त करण्याचे ठरविले आहे. सदरील योजनेच्या नियोजनाच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे योजने संदर्भाने करावयाच्या प्राथमिक तयारीच्या कामाकरीता संपुर्ण वसाहतींचे सर्वेक्षण करणे अंतर्गत खालील प्रमाणे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.**

**(1) Socio-Economic Survey**

**(2) Boi-Metric Identity Capture Survey to issuing boi-metro cards**

**(3) Entry of data from slum Survey to generate web-enable city level database and baseline reports for city level technical cell.**

**(4) Development of city base map & Slum maps using GIS with carat sat/carat sat images.**

**(5) Preparation of slum redevelopment/Rehabilitation plans, zonal plans and city level slum free plans of action.**

**उपरोक्त सर्वेक्षणाकरीता व प्राथमिक माहिती संकलित करण्याकरीता आवश्यक असणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मुख्य अभियंता-2, म्हाडा, मुंबई तसेच संचालक (एन.बी.ओ.) आणि ओ.एस.डी. (जे.एन.एन.यु.आर.एम.) यांना सादर करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने शासनाकडून 136.00 लक्षचा निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.**

**उक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने समांतर कार्यवाही म्हणून औरंगाबाद महानगरपालिकेने निविदा सूचना प्रकाशीत करण्यात आली असता, एकूण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या. व प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता, त्यात खालील प्रमाणे दर भरुन प्राप्त झाले.**

**मे. सिमा कन्सल्टंट, टाऊन हॉल, व्ही.आय.पी.रोड, औरंगाबाद**

**<u>भाग - 1</u>**

| प्रभागाचे नांव | With Bio metric (प्राप्त दर) | Without Bio metric (प्राप्त दर) |
|---|---|---|
| अ | 56.77% जास्त दराने + सेवा कर | 38.77% जास्त दराने + सेवा कर |
| ब | 57.77% जास्त दराने + सेवा कर | 39.77% जास्त दराने + सेवा कर |
| क | 57.77% जास्त दराने + सेवा कर | 38.99% जास्त दराने + सेवा कर |
| ड | 64.99% जास्त दराने + सेवा कर | 44.69% जास्त दराने + सेवा कर |
| इ | 65.77% जास्त दराने + सेवा कर | 45.77% जास्त दराने + सेवा कर |
| फ | 64.77% जास्त दराने + सेवा कर | 44.77% जास्त दराने + सेवा कर |

**<u>भाग - 2</u>**

वार्ड निहाय सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रकल्प अहवाल किंमतीच्या 1.50% दराने + सेवा कर

**भाग - 3**

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणुन प्रकल्प अहवाल किंमतीच्या 4.1 % दराने + सेवा कर

मे. आर्क असोसिएट्स, त्रिमुर्ती चौक, औरंगाबाद

**भाग - 1**

| प्रभागाचे नांव | With Bio metric (प्राप्त दर) | Without Bio metric (प्राप्त दर) |
|---|---|---|
| अ | 65.11% जास्त दराने + सेवा कर | 45.99% जास्त दराने + सेवा कर |
| ब | 65.11% जास्त दराने + सेवा कर | 45.99% जास्त दराने + सेवा कर |
| क | 65.11% जास्त दराने + सेवा कर | 45.99% जास्त दराने + सेवा कर |
| ड | 59.99% जास्त दराने + सेवा कर | 39.99% जास्त दराने + सेवा कर |
| इ | 59.99% जास्त दराने + सेवा कर | 39.99% जास्त दराने + सेवा कर |
| फ | 59.99% जास्त दराने + सेवा कर | 39.99% जास्त दराने + सेवा कर |

**भाग - 2**

वार्ड निहाय सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रकल्प अहवाल किंमतीच्या 1.62% दराने + सेवा कर

**भाग - 3**

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणुन प्रकल्प अहवाल किंमतीच्या 4.23% दराने + सेवा कर

मे.सिमा कन्सल्टंट, टाऊन हॉल, व्ही.आय.पी.रोड औरंगाबाद यांनी प्रभाग अ, ब आणि क साठी कमी दराची निविदा सादर केलेली आहे. तसेच मे. आर्क असोसिएट्स, त्रिमुर्ती चौक, औरंगाबाद यांनी प्रभाग ड, इ आणि फ साठी कमी दराची निविदा सादर केलेली आहे.

उपरोक्त प्राप्त जास्त दराच्या अनुषंगाने संबंधित एजन्सी यांना वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले असता, वाटाघाटी अंती संबंधित एजन्सी यांनी अत्यंत कमी प्रमाणात दर कमी केले तसेच त्यांनी सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर साठी लागणारा खर्च मनपाने द्यावे अशी अट मांडली.

त्या अनुषंगाने संबंधितांना पुन्हा वाटाघाटीसाठी बोलावण्यात आले असता, त्यांनी लेखी संमतीद्वारे खालील प्रमाणे दर सादर केलेले आहेत.

मे. सिमा कन्सल्टंट, टाऊन हॉल, व्ही.आय.पी.रोड, औरंगाबाद

**भाग - 1**

| प्रभागाचे नांव | With Bio metric | Without Bio metric |
|---|---|---|
| अ | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |
| ब | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |
| क | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |

**भाग - 2**

सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रकल्प अहवाल किंमतीच्या 1.40% दराने + सेवा कर

**भाग - 3**

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणुन प्रकल्प अहवाल किंमतीच्या 4.00% दराने + सेवा कर

**भाग - 4**

सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर साठी लागणारा खर्चाची मागणी संबंधित एजन्सी मार्फत करण्यात आलेली नाही.

मे. आर्क असोसिएट्स, त्रिमुर्ती चौक, औरंगाबाद

**भाग - 1**

| प्रभागाचे नांव | With Bio metric | Without Bio metric |
|---|---|---|
| ड | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |
| इ | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |
| फ | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |

**भाग - 2**

**सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रकल्प अहवाल किंमतीच्या 1.40% दराने + सेवा कर**

**भाग - 3**

**प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणुन प्रकल्प अहवाल किंमतीच्या 4.00% दराने + सेवा कर**

**भाग - 4**

**सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर साठी लागणारा खर्चाची मागणी संबंधित एजन्सी मार्फत करण्यात आलेली नाही.**

**उपरोक्त दर्शविल्यानुसार सर्वेक्षणाच्या कामासाठी शासनाकडून रुपये 136.00 लक्षचा निधी महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. तसेच शासनाकडून ज्या प्रमाणात निधी प्राप्त होईल त्या प्रमाणात सर्वेक्षणाच्या कामाचे देयक संबंधित एजन्सी यांना अदा करण्यात येईल. तथापी वाटाघाटी अंती निश्चित करण्यात आलेल्या दरास मा. आयुक्त महोदय यांनी मान्यता प्रदान केलेली आहे. करिता वर दर्शविल्यानुसार वाटाघाटी अंती निश्चित झालेल्या निविदा दरानुसार प्रभाग अ, ब आणि क साठी मे. सिमा कन्सल्टंट आणि प्रभाग क्रमांक ड, इ आणि फ साठी मे. आर्क असोसिएट्स यांना सर्वेक्षणाचे काम देणेसाठी मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.**

**संवाद :**

| | |
|---|---|
| **मा.सभापती** | **: विषय मंजुर करण्यांत येतो. सर्वेबाबत खुलासा करण्यात यावा.** |
| **कार्यकारी अभियंता(बीओटी)** | **:सोशो इकॉनॉमिक सर्वे केलेला आहे. 25 रूपये प्रत्येकी असे आलेले आहे. बायोमॅट्रीक केल्यास 20 रूपये प्रत्येकी आहे. पहिल्या टप्प्यामध्ये एक कोटीचे काम आहे.** |
| **श्री.विजेंद्र जाधव** | **:ज्या एजन्सीला काम देणार आहे मनपाचा मागील अनुभव वाईट आहे.** |
| **मा.सभापती** | **:शासनाचा निधी आहे. स.सदस्यांच्या भावना आहे की, सदरील काम होत असतांना कुठल्याही चुका होऊ नये. नागरीकांना याचा फायदा झाला पाहिजे.** |
| **श्री.समीर राजुरकर** | **:बायोमॅट्रीक ओळखपत्र देण्यात येणार आहे.** |
| **कार्यकारी अभियंता(बीओटी)** | **:बायोमेट्रीक झाल्यानंतर पुर्ण डाटा तयार करावा लागेल.** |
| **श्री.समीर राजुरकर** | **:बायोमेट्रॉकार्ड म्हणजे काय?** |
| **कार्यकारी अभियंता(बीओटी)** | **:85, 38% आणि सेवा कर म्हणुन त्यांचे रेट आहे. शासनाचे कडक नियम आहे. म्हणुन त्याचेशी वाटाघाटी करून अंदाजपत्रक दराने काम देण्यात येत आहे.** |
| **श्री.समीर राजुरकर** | **:प्रशासनाकडे बायोमेट्रॉचे सॅम्पल जमा झाले पाहिजे.** |
| **मा.सभापती** | **:पर हाऊस कसे ठरविण्यात आलेले आहे.** |
| **कार्यकारी अभियंता (बीओटी)** | **:सोशो इकॉनॉमिक सर्वे केलेला आहे. 25 रूपये पर हाऊस आहे. दोन वर्षापासून कुठलिही एजन्सी काम घेण्यास तयार नाही. एकुण सहा झोन पैकी 3 झोन सिमा आणि 3 झोन आर्केड यांना दिलेले आहे. महत्वाचे काम आहे. शासनाकडुन वारंवार विचारणा होत आहे.** |

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केंद्र शासनातर्फे जाहीर झालेल्या राजीव आवास योजने अंतर्गत शहरे झोपडपट्टी मुक्त करावयाच्या नियोजनाच्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे योजने संदर्भाने प्राथमिक तयारीच्या कामाकरीता संपुर्ण वसाहतींचे सर्वेक्षणाचे कामासाठी प्राप्त निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार खालील दर्शविल्यानुसार प्रभाग अ, ब आणि क साठी मे. सिमा कन्सल्टंट आणि प्रभाग क्रमांक ड, इ आणि फ साठी मे. आर्क असोसिएट्स यांना सर्वेक्षणाचे काम देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.**

**मे. सिमा कन्सल्टंट, टाऊन हॉल, व्ही.आय.पी.रोड, औरंगाबाद**

**<u>भाग - 1</u>**

| प्रभागाचे नांव | With Bio metric | Without Bio metric |
|---|---|---|
| अ | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |
| ब | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |
| क | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |

**<u>भाग - 2</u>**

**सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रकल्प अहवाल किंमतीच्या 1.40% दराने + सेवा कर**

**<u>भाग - 3</u>**

**प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणुन प्रकल्प अहवाल किंमतीच्या 4.00% दराने + सेवा कर**

**<u>भाग - 4</u>**

**सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर साठी लागणारा खर्चाची मागणी संबंधित एजन्सी मार्फत करण्यात आलेली नाही.**

**मे. आर्क असोसिएट्स, त्रिमुर्ती चौक, औरंगाबाद**

**<u>भाग - 1</u>**

| प्रभागाचे नांव | With Bio metric | Without Bio metric |
|---|---|---|
| ड | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |
| इ | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |
| फ | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर | अंदाजपत्रकीय दराने + सेवा कर |

**<u>भाग - 2</u>**

**सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी प्रकल्प अहवाल किंमतीच्या 1.40% दराने + सेवा कर**

**<u>भाग - 3</u>**

**प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क म्हणुन प्रकल्प अहवाल किंमतीच्या 4.00% दराने + सेवा कर**

**<u>भाग - 4</u>**

**सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरसाठी लागणारा खर्चाची मागणी संबंधित एजन्सी मार्फत करण्यात आलेली नाही.**

**वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**<u>टीप :</u>** मा. सभापती, स्थायी समिती यांचे पत्र जा.क्र.मनपा/सभापती/2012/116 दि.2/11/2012 नुसार....

1) दिनांक 03/08/2012 (का.प.क्र.8) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.27 अन्वये सुनावणी घेण्यात आलेल्या अपिलावर निर्णय घोषीत करणे.
2) दिनांक 10/08/2012 (का.प.क्र.9) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.35 अन्वये सुनावणी घेण्यात आलेल्या अपिलावर निर्णय घोषीत करणे.
3) दिनांक 10/08/2012 (का.प.क्र.9) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.36 अन्वये सुनावणी घेण्यात आलेल्या अपिलावर निर्णय घोषीत करणे.

4) **दिनांक 21/08/2012 (का.प.क्र.10) रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.42 अन्वये सुनावणी घेण्यात आलेल्या अपिलावर निर्णय घोषीत करणे.**
5) **दिनांक 21/08/2012 (का.प.क्र.10) रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.43 अन्वये सुनावणी घेण्यात आलेल्या अपिलावर निर्णय घोषीत करणे.**
6) **दिनांक 28/08/2012 (का.प.क्र.11)रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.44 अन्वये सुनावणी घेण्यात आलेल्या अपिलावर निर्णय घोषीत करणे.**
7) **दिनांक 28/08/2012 (का.प.क्र.11)रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.45 अन्वये सुनावणी घेण्यात आलेल्या अपिलावर निर्णय घोषीत करणे.**
8) **दिनांक 07/09/2012 (का.प.क्र.12)रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र.49 अन्वये सुनावणी घेण्यात आलेल्या अपिलावर निर्णय घोषीत करणे.**

**मा.सभापती : मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे काही कर्मचाऱ्यांनी स्थायी समितीकडे अपिल केले होते. सर्वप्रथम मनपापॅनलचे वकील श्री.मुळे यांचे धन्यवाद करण्यात येतात. सर्व कारवाईमध्ये त्यांनी सहकार्य केलेले आहे. सुनावणी दरम्यान ते सभागृहात हजर होते. कायदेशिररित्या सर्व फाईडींग काढुन दिलेले आहेत.**

**मा.सभापती** : 1124 veewkeâj Yejleer ØekeâjCe heg<heveiejer Je Yegmebheeove ØekeâjCeele ye[lehe&â PeeuesuÙee keâce&ÛeeNÙeebveer lemesÛe ßeer.jecešskesâ Ùeebveer les heoeJevele PeeuÙeeyeeyele mLeeÙeer meefceleer meceesj Deefheue oeKeue kesâues Deens. DeheerueeLeea 1.ceOegkeâj yeeJemkeâj, 2.Deefveue JeeUgpekeâj, 3.ef[.yeer.uees Keb[s, 4.DeMeeskeâ Jeekesâkeâj, 5.Sme.Sme.ieeÙekeâJee[, 6.[er.Sce.MenehegjJee[, 7.efš.peer.peeOeJe, Ùeebveer lÙeebvee osCÙeele DeeuesuÙee ye[leheâeaÛÙee DeeosMeeefJe¤Oo cee.GÛÛe vÙeeÙeeueÙe Keb[heer", Deewjbieeyeeo ÙeebÛes keâ[s efjš ÙeeÛeerkeâe oeKeue kesâueer nesleer. cee.GÛÛe vÙeeÙeeueÙeeves meojerue ÙeeÛeerkeâe efvekeâeueer keâe{leebvee ÙeeÛeerkeâe keâlexs Ùeebveer cegbyeF& Øeeleerkeâ ceneveiejheeefuekeâe DeefOeefveÙece 1949 ÛÙee lejlegoervegmeej mLeeÙeermeefceleer cevehee, Deewjbieeyeeo ÙeebÛÙee keâ[s ØeLece DeeJesove efvekeâeueeÛÙee 15 efoJemeele oeKeue keâjeJes, lÙeeÛeØeceeCes mLeeÙeer meefceleerves meojerue Deefheue ueJekeâjele ueJekeâj efvekeâeueer keâe{eJesle Demes DeeosMe efoues nesles.

cee.GÛÛe vÙeeÙeeueÙeeÛÙee Ghejesòeâ DeeosMeeØeceeCes DeefheueeefLe& Ùeebveer mLeeÙeer meefceleermeceesj ØeLece DeeJesove meeoj keâ¤ve DeeÙegòeâ ceneveiejheeefuekeâe Ùeebveer efouesues ye[leheâea DeeosMe jö keâ¤ve

DeefheueeLeea Ùeebvee hegvne mesJesle hegJe&ue#eer ØeYeeJeeves meeceeJegve IÙeeJes DeMeer efJevebleer kesâueer nesleer. IÙeevegmeej DeefheueeÛeer megveeJeCeer IesCÙeele Deeueer. megveeJeCeer ojcÙeeve DeefheueeLeea Ùeebveer mJeleŠ yeepeg ceeb[ueer lemesÛe cevehee ØeMeemeveelehexâ ßeer.DeeÙegye Keeve Ùeebveer yeepeg ceeb[gve ye[leheâea DeeosMe keâeÙeÅeeuee Oe¤ve Deensle Demes cele JÙeòeâ kesâues.

lemesÛe DeefheueeLeea ßeer.efMejer<e jecešskeâs Ùeebvee GheDeefYeÙeblee Ùee heoeJe¤ve keâefve‰ DeefYeÙeblee heoeJej heoeJevele keâjCÙeele Deeues nesles. IÙeeefJe¤Oo IÙeebveer megOoe mLeeÙeer meefceleerkeâ[s Deefheue kesâues Ùee DeefheueeÛÙee megveeJeCeer ojcÙeeve ßeer.jecešskesâ Ùeebveer mJeleŠ yeepeg ceeb[ueer Je cevehee ØeMeemeveelehexâ ßeer.DeeÙegye Keeve Ùeebveer yeepeg ceeb[ueer.

DeefheueeLeea Je cevehee ØeMeemeve Ùee oesvner he#eebÛee ÙegòeâerJeeo SskeâuÙeeveblej ØekeâjCeebMeer mebyebOeerle mebhegCe& mebefÛekeâe, keâeieohe$es ÛeewkeâMeer DenJeeue leheeemeues Demelee. IÙeeceOÙes KeeueerueØeceeCes efveCe&Ùe osCÙeele Ùesle Deens.

efveCe&Ùe -

1. meJe& DeefheueeLeeAÛes Deheerue cebpegj keâjCÙeele Ùesle Deensle.
2. ÛeewkeâMeer DeefOekeâejer ÙeebÛes efve<keâ<e& lemesÛe DeeÙegòeâ cevehee, Deewjbieeyeeo ÙeebÛes ye[leheâea DeeosMe jö keâjCÙeele ÙesJegve DeheerueeLeeAvee mesJee meelelÙeemen hegJe&}#eer ØeYeeJeeves veewkeâjerle hegvemLee&heerle keâjCÙeeÛes DeeosMe osCÙeele Ùesle Deens.
3. ßeer.efMejer<e jecešskesâ ÙeebÛes Deefheue cebpegj keâjCÙeele Ùesle Demegve IÙeebvee hegJe&Jele GheDeefYeÙeblee Ùee heoeJej hegJe&}#eer ØeYeeJeeves mesJesle ®peg keâ¤ve IesCÙee mebyebOeerÛes DeeosMe osle Deens.
4. ßeer.šer.peer.peeOeJe ns efo. 30 mehšWyej 2011 jespeer efveÙele JeÙeesceeveevegmeej mesJeeefveJe=òe Peeues

DemeuÙeeves lÙeebvee efveJe=òeerveblejÛes meJe& heâeÙeos efveÙeceeØeceeCes osCÙeele ÙeeJesle.

5. ßeer.šer.peer.peeOeJe Ùeebveer cevehee DeeÙegòeâ Ùeebveer ob[ kesâuesueer jkeäkeâce hejle keâjCÙeeyeeyele kesâuesueer efJevebleer hesâšeUCÙeele Ùesles.

6. meJe& DeefheueeLeeaÛes efo.6/9/2011 efo.7/9/2011 heemegve mesJee meelelÙe keâeÙece "sJegve lÙeebvee Deepe heemegve mesJesle ¤peg keâ¤ve IesJegve lÙeebvee osÙe Demeuesues Jesleve, Yeòes, Deoe keâjCÙeele ÙeeJes.

efo. 08/11/2012

ef"keâeCe – Deewjbieeyeeo.

**<u>ऐनवेळचे विषय</u>**

**<u>विषय क्र.86 :</u>**

**प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रशासकीय इमारत टप्पा क्र.1, 2 व 3 अंतर्गत वार्षीक देखभाल दुरूस्ती व तातडीची विविध कामे करणेसाठी रक्कम रू.19,90,204/- चे अंदाजपत्रकास मंजुरी घेऊन कामाच्या निविदा बोलविण्यात आले असता प्राप्त निविदा मंजुर असून सदरील काम कंत्राटदार श्री.एस.एम.इब्राहिम यांना दिलेल्या कार्यादेश जा.क्र./मनपा/अशअ/874/2011, दिनांक 13/09/2011 नुसार देखभाल दुरूस्तीचे कामे ते करत आहेत. सदरील कामाची मुळ निविदा 38.38% जास्त दराने मंजुर असल्याने मुळ कामावरील अपेक्षित खर्च रक्कम रू.27,54,044/- होतो. या कामा अंतर्गत आतापर्यंत रक्कम रू.8,14,291/- चे प्रथम व दरम्यान देयक अदा करण्यात आले आहे. मनपा इमारती टप्पा क्रं.1, 2 व 3 अंतर्गत आवश्यकतेनुसार काही कामे तातडीने करून घेणेसाठी व परिशिष्ट-ब मध्ये समाविष्ट नसलेल्या अतिरिक्त बाबीचे अंदाजपत्रक EIRL-1 रक्कम रू.9,98,959/- चे तयार करून त्यास मंजुरी घेण्यात आली. सदरील अतिरिक्त बाबीचे रक्कम रू.9,98,959/- यास मुळ मंजुर मान्यतेपेक्षा जास्त खर्च होणार नाही या अटीवर मा.आयुक्तांनी दिनांक 07/02/2012 रोजी मान्यता दिली आहे.**

**मा.सभापती (स्थायी समिती) यांनी त्यांचे दालनाचे नुतणीकरण व अंतर्गत बदल करणेसाठी पत्र दिले व त्यासाठी आर्थिक तरतुद उपलब्ध करून देणेसाठी मा.महापौरांचेही देखील पत्र प्राप्त झाले. चालु वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात प्रशासकीय इमारत या लेखाशिर्ष अंतर्गत स्पील ओव्हर कामाच्या यादीत प्रशासकीय इमारत देखभाल दुरूस्तीच्या कामासाठी पान क्र.14 अ.क्र.01 नुसार र.रू.32.00 लक्ष व मा.सर्वसाधारण सभेने शिफारस केलेल्या यादीत मा.सभापती यांच्या दालनाच्या कामासाठी पान क्र.05 अ.क्र.02 नुसार रू.30.00 लक्ष अशी एकुण र.रू.62.00 लक्षची तरतुद उपलब्ध आहे. प्रशासकीय इमारत टप्पा क्र.1, 2 व 3 अंतर्गत वार्षीक देखभाल दुरूस्ती व तातडीचे विविध कामे करणे या मंजुर निविदेच्या अंतर्गत कंत्राटदार श्री.एस.एम.इब्राहीम यांच्याकडून मा.सभापती यांचे दालनाची दुरूस्ती सुरू करून घेण्यात आली असता आणि दालनातील दुरूस्तीचे नुतणीकरणाचे काम प्रगतीपथावर असतांना मा.सभापती यांनी या कामाअंतर्गत काही काम करून घेण्यासाठी सुचविल्यानुसार काही अतिरिक्त बाबीचे काम झाले आहे, त्या अतिरिक्त बाबीचे EIRL-II ची अंदाजपत्रक रक्कम रू.15,02,111/- होत आहे. दोन्ही टप्प्यातील अतिरिक्त बाबीचे दर PWD DSR 2011-12 व जे दर DSR मध्ये नाहीत, ते खुल्या बाजारातून घेण्यात आले आहे.**

**मुळ मंजुर निविदेच्या परिशिष्ट-ब मधील बाबी, अतिरिक्त बाबी EIRL-1 व अतिरिक्त बाबी EIRL-II मिळुन एकूण खर्च रक्कम रू.46,09,474/- झाला आहे. एकंदरीत झालेला खर्च व**

प्रगतीपथावरील कामांची रक्कम रू.49,34,474/- होत आहे. त्यासाठी मा.आयुक्त महोदय यांनी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.860, दिनाक 04/09/2012 अन्वये दिनांक 20/10/2012 रोजी मान्यता दिली आहे.

कामाचे विवरण खालील प्रमाणे आहे.

1. मंजुर अंदाजपत्रक र.रू.19,90,204/-
2. मुळ कामाचे मंजुर निविदा दर 38.38% जास्त दरानेर.रू.27,54,044/-
3. EIRL-1 अतिरिक्त बाबीची मंजुर र.रू.9,98,959+4,07,708/-र.रू.14,06,667/-
4. EIRL-II अतिरिक्त बाबीर.रू.15,02,111/-

प्रस्तावित कामामध्ये एकुण र.रू.29,08,778/- च्या अतिरिक्त बाबींचा समावेश झालेला आहे. मुळ मंजुर अंदाजपत्रकाच्या परिशिष्ट-ब मधील बाबीवर रक्कम रू.19,90,204/- पैकी र.रू.17,00,696/- खर्च झालेला आहे. असे सदरील कामावर एकुण खर्च र.रू.46,09,474/- इतका खर्च झालेला आहे. या कामावर झालेला खर्च र.रू.46,09,474/- आणि प्रगतीपथावरील कामावर र.रू.3,25,000/- अशी एकूण रक्कम रू.49,34,374/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास आणि झालेली व करावयाची वाढीव कामे मुळ कंत्राटदार श्री.एस.एम.इब्राहीम यांच्याकडुन निविदेतील परिशिष्ट-ब मधील बाबी मंजुर निविदा दर 38.38% जास्त दरानुसार व अतिरिक्त बाबी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चालु दरसुची व खुल्या बाजारातील दरानुसार केलेल्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रू.49,34,374/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती: विषय मंजुर करण्यांत येतो.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रशासकीय इमारत टप्पा क्र.1, 2 व 3 अंतर्गत वार्षीक देखभाल दुरूस्ती व तातडीची विविध कामे करणेसाठी प्राप्त निविदेनुसार निविदाधारक श्री.एस.एम.इब्राहीम यांची मंजुर निविदा दर 38.38% जास्त दराची असल्याने व मा.सभापती (स्थायी समिती) यांचे दालनाचे नुतणीकरण व अंतर्गत बदल करणेचे काम प्रगतीपथावर असतांना मा.सभापती यांनी या कामाअंतर्गत काही काम करून घेण्यासाठी सुचविल्यानुसार काही अतिरिक्त बाबीचे कामासाठी रक्कम रू.46,09,474/- व प्रगतीपथावरील कामावर र.रू.3,25,000/- अशी एकूण रक्कम रू.49,34,374/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.860, दिनाक 04/09/2012 अन्वये दिनांक 20/10/2012 रोजी मान्यता दिली असल्याने, प्रस्तावित कामामध्ये एकुण र.रू.29,08,778/- च्या अतिरिक्त बाबींसह झालेली व करावयाची वाढीव कामे मुळ कंत्राटदार श्री.एस.एम.इब्राहीम यांच्याकडुन निविदेतील परिशिष्ट-ब मधील बाबी मंजुर निविदा दर 38.38% जास्त दरानुसार व अतिरिक्त बाबी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चालु दरसुची व खुल्या बाजारातील दरानुसार केलेल्या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रू.49,34,374/- च्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र.87 :</u>

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, लेखन व संगणक साहित्य खरेदीकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकुण तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्यांची नांवे पुढीलप्रमाणे आहे. 01.औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी ग्राहक संस्था म., 02.न्यु भारत स्टोअर्स, 03.ओके ट्रेडर्स यापैकी ओके ट्रेडर्स यांना 20 Item मिळाले असून न्यु भारत स्टोअर्स यांना 14 Item मिळाले आहे व 28 Item दोघांचे दर समान आहे.

त्यांचे प्राप्त दरानुसार साहित्य खरेदीसाठी प्रस्ताव केंद्रीय खरेदी समितीसमोर ठेवण्यात आला होता. केंद्रीय खरेदी समितीच्या दि.09/10/2012 रोजी झालेल्या बैठकीत सदर निविदा धारकांसोबत प्राप्त दरात वाटाघाटी करून प्राप्त दरात 4% दर कपात करून येणाऱ्या दरात साहित्य खरेदीसाठी

समितीने शिफारस केली आहे. प्राप्त दरांचा तुलनात्मक तक्ता सोबत अवलोकनास्तव जोडलेला आहे.

त्यानुसार मे.न्यु भारत स्टोअर्स यांचेकडून साहित्य खरेदीसाठी एकुण रू.14,09,673/- आणि मे.ओके ट्रेडर्स यांचेकडून साहित्य खरेदीसाठी एकुण रू.15,23,535/- असे एकुण रू.29,33,208/- एवढा खर्च येत आहे. सदर दरास व त्यानुसार येणाऱ्या खर्चास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लेखन व संगणक साहित्य खरेदीकरीता प्राप्त झालेल्या निविदेनुसार निविदाधारक 01. न्यु भारत स्टोअर्स व 02. ओके ट्रेडर्स यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार प्राप्त दरात 4% दर कपात करून मे.न्यु भारत स्टोअर्स यांचेकडून साहित्य खरेदीसाठी एकुण रू.14,09,673/- आणि मे.ओके ट्रेडर्स यांचेकडून साहित्य खरेदीसाठी एकुण रू.15,23,535/- असे एकुण रू.29,33,208/- त्यानुसार येणाऱ्या वाढीव खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

विषय क्र.88 :

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सेव्हनहिल उड्डाणपुलावर पथदिव्यांचे नुतणीकरण करण्याचे कामाचे अंदाजपत्रक सन 2011-12 सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची तसेच बजाज कंपनीच्या कोटेशननुसार रक्कम रू.49,98,605/- चे तयार करण्यांत आले असून, सदरचे काम अर्थसंकल्प 2012-13 मधील लेखाशिर्षक विकास योजने अंतर्गत बाधित विद्युत खांब व रोहित्र स्थलांतरीत करणे मधुन प्रस्तावित करण्यांत आलेले आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांची दिनांक 03/11/2012 रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

करीता रक्कम रू.49,98,605/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

ठराव :

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सेव्हनहिल उड्डाणपुलावर पथदिव्यांचे नुतणीकरण करण्याचे कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.49,98,605/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याच बरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.